
# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिदिन कार्यक्रम




पुढारी




दै. केसरी
वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा!
खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे.
साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे.
शिनेश्वर विद्यालय
कुडे बु।।., ता.खेड, जि.पुणे.
स्व.साहेबरावजी बुट्टेपाटील
माजी आमदार, खेड तालुका
स्मृतिदिनानिमित्त
विनम्र अभिवादन
मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, सर्व संचालक, सभासद,
शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी.

# 'स्व. बुट्टेपाटील आदर्शवादी चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व'

**राजगुरूनगर, दि. ५ (प्रतिनिधी)** - माजी आमदार स्व. साहेबराव बुट्टेपाटील यांनी राजकारणात कृती आणि वृत्ती यांचा आदर्श निर्माण केला असून ते खऱ्या अर्थाने आदर्शवादी चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरोद्गार प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. सुहास कांबळे यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्व. साहेबराव बुट्टेपाटील यांच्या १९ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांकटे, अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, अ‍ॅड. गणेश सांडभोर, महादेव ठाकूर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य एस. एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सुहास कांबळे यांनी प्रथमतः साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाचा आढावा घेतला. त्यांच्या समाजकारणाचा वसा आपण पुढे घेऊन जायला हवे. त्यांच्या विचारांचा नंदादीप सदैव तेवत ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कोणत्याही अपघातावेळी प्रथोमोपचाराची गरज असून तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अपघात झाल्यानंतर रुग्णाला असलेला धोका, रुग्णाचा प्रतिसाद श्वसनाचा मार्ग, शसोच्चावास, रक्ताभिसरण याबद्दल माहिती दिली. जखमी रुग्णांची वाहतूक, अस्तिभंग, मणक्याचा अस्तिभंग, झटके, भाजणे, इलेक्ट्रानिक शॉक, हृदयविकार याबद्दल कोणती प्राथमिक खबरदारी घ्यायची या विषयी माहिती दिली. तसेच बेसिक लाईफ सपोर्ट हा कोर्स विद्यार्थ्यांनी करावा असे आवाहन केले. यावेळी त्यांच्यासमवेत असलेले डॉ. संदेश कुमार जकाते, डॉ. शैलेजा गायकवाड, अश्विनी पितळे यांनी प्रथोमोपचाराचे प्रात्याक्षिक करून दाखविले.



**राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्व. साहेबराव बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुतळ्यास अभिवादन करताना मान्यवर.**

## विद्यार्थ्यांना दिली राष्ट्रप्रेमाची शपथ

स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, भीत्तिपत्रकाचे अनावरण, पोस्टर प्रदर्शन, मराठीतील विविध बोलीभाषांमधील कवितांचे प्रदर्शन रक्तदान शिबीर, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा आदि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेमाची शपथ देण्यात आली. या शपथेचे वाचन प्रा. उमेश जगताप यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे १३४ दात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधिक्षक अरुण बर्डे, डॉ. राजश्री चांदोळकर, डॉ. प्रिया त्रिपाठी, डॉ. सुदेश्रा गजभिये, डॉ. सुकृती ठाकूर सहभागी झाले. अक्षय कोळेकर व कोमल गायकवाड या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमांचे आयोजन हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विविध विभागांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले.

प्रभात Mon, 06 January 2020
epaper.eprabhat.net/c/47672497

लोकमत

# साहेबराव बुट्टेपाटील आदर्शवादी व्यक्ती

## सुहास कांबळे । रक्तदान शिबिरात १३४ जणांनी घेतला सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : माजी आमदार साहेबराव बुट्टेपाटील यांनी राजकारणात कृती आणि वृत्ती यांचा आदर्श निर्माण केला असून ते आदर्शवादी चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरोद्गार प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. सुहास कांबळे यांनी केले.



शिबिरात सहभागी झालेले रक्तदाते.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात साहेबराव बुट्टेपाटील यांच्या १९ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांकटे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, ॲड. गणेश सांडभोर, महादेव ठाकूर, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, भीत्तिपत्रकाचे अनावरण, पोस्टर प्रदर्शन, मराठीतील विविध बोलीभाषांमधील कवितांचे प्रदर्शन रक्तदान शिबिर, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेमाची शपथ देण्यात आली. या शपथेचे वाचन प्रा. उमेश जगताप यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे १३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधिक्षक अरुण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. राजश्री चांदोळकर, डॉ. प्रिया त्रिपाठी, डॉ. सुदेश्ना गजभिये, डॉ. सुकृती ठाकूर सहभागी झाले. या सर्व कार्यक्रमांचे आयोजन हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विविध विभागांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनसे यांनी केले.

- सुहास कांबळे यांनी अपघात झाल्यानंतर रुग्णाला असलेला धोका, रुग्णाचा प्रतिसाद श्वसनाचा मार्ग, शसोच्छ्वास, रक्ताभिसरण याबद्दल माहिती दिली. जखमी रुग्णाची वाहतूक, अस्तिभंग, मणक्याचा अस्तिभंग, झटके, भाजणे, इलेक्ट्रानिक शॉक, हृदयविकार याबद्दल कोणती प्राथमिक खबरदारी घ्यायची या विषयी माहिती दिली. या वेळी डॉ. संदेश कुमार जकाते, डॉ. शैलेजा गायकवाड, अश्विनी पितळे यांनी अपघातानंतर घ्यावयाच्या प्रथोमोपचाराचे प्रात्यक्षिक करुन दाखविले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 05, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख